| Item No | DESCRIPTION |
|---|---|
| A | Set of one pair of black shoes with laces and two pairs of white socks for boys for Std I to VII |
| B | Set of one pair of black shoes with buckle and two pairs of white socks for Girls for Std I to VII |
| **SPECIFICATION OF BLACK SHOES FOR PMC STUDENTS** | |
| • | Shoes of PVC sole with PC/PV fabric (woven/non-woven) for upper black colour as per FDDI specification and IS- 1638-1969 (reaffirmed 1997) for sizes and fittings of footwear |
| • | Nylon Socks- white coloured as per IS-5084:1990 or latest |
| The Design prescribed in this standard for boys and girls shoes is for school going boys and Girls for various sizes. Keeping in view the foot comfort as well as the factors for the healthy growth of their feet, wide fitting "G" have been recommended. It is hoped that the educational authorities would popularize the shape and fitting recommended through there dress regulations for school going boys and girls | |
| | SCOPE – This Standard prescribes the requirements, methods of sampling and tests for boys and girls school shoes |
| | TERMINOLOGY – For the purpose of this standard the definition given in IS 2050: 1967 shall apply |
| | REQUIRMENTS<br>3.1 Material Upper Material PVC coated on PC/PV fabric (woven/non-woven) for main part of Upper 1.8 mm +-0.2 mm thick<br>Insock- Fabric of thickness -0.8 mm +- 0.2 mm with spongy PVC foam of thickness 2.5 mm +- 0.5 mm (fabric surface towards foot) Buckle – Steel buckles with rustproof coating according to width of the strap ranging from 12 mm to 18 mm shall be used. Sole – Expanded PVC material of high quality of density -0.75 mm +-0.5g/cc Lance – Round nylon lace diameter 3 mm +- 0.5mm. 65 cm long +-2 cm Eyelet - Black enameled aluminum eyelet – 4 mm with washer Binding/Piping – Nylon tape of best trade quality-16 mm width for girls – Steel Buckle with rustproof coating width 12 mm to 18 mm Counter stiffener – Strobel cloth 1.4 mm +- 0.2 mm thick Thread – Nylon thread 40/3&60/2<br>3.2 Shape and design – The shape shall be made to the pattern, shape and design . The shoes shall be made on lasts in sizes 9 to 7;fitting 'G' are recommended, If desired, the purchaser shall specify type, age group and fitting of the last in the order contract<br>3.3 Soling Pattern-<br>3.3.1 The soling shall not include continuous lateral tread patterns of any other features such as sharp corners at the base of the sole pattern, which may accelerate or cause premature crack formation<br>3.3.2 The design should be such that the sole will have adequate skid resistance with cleat height of min, 1 mm<br>3.3.3 The minimum thickness of the sole shall not be less than 3 mm<br>3.3.4 Forepart thickness shall be 10 mm (-2mm +-5mm)<br>3.3.5 Heel thickness shall be 18 mm +- 5 mm<br>Note – The pattern of sole may have significant effect on the |

| | | |
|---|---|---|
| | | formulation of premature cracks and safety on slippery surfaces |
| | 3.4 | Manufacture |
| | 3.4.1 | The upper shall be closed with lock stitching using nylon threads, The number of stitches shall be 3 to 4 centimeter, All Loose ends of the threads shall be secured |
| | 3.5 | Finish – The upper of the shoe shall be finished by polishing and brushing to impart shine to the shoes |
| | 3.6 | Sole Hardness – The hardness of the sole shall be measured in not less than 4 days but not more than 90 days after molding and when tested in accordance with the method prescribed in IS 12240(Part 2):1988 after conditioning shall be within 70=10 |
| | 3.7 | Volatility - When tested in accordance with IS 12240(Part 2) 1988 using test pieces of PVC compound taken from soling components respectively, the mean loss in mass of the three test pieces shall not exceed 2.00 percent |
| | 3.8 | Lead Content – The lead content (as Pb) shall not be more than 2 ppm max when determined in accordance with the method prescribed in IS 12240 (part 5) :1988 |
| | 3.9 | Resistance cut growth (flexing test) for sole When parts of sole are tested in accordance with the method prescribed in IS 12240 (part 7) :1988 the cut growth shall not be more than 300 percent after the test piece is subjected to 150000 flex cycles. |
| | 3.10 | Resistance to flexing for upper – When parts of the upper are tested in accordance with the method prescribed in SATRA PM 55( BALLY flexing). No cracking shall occur during 80,000 flex cycles. |
| | 3.11 | Rear strength on upper material – When parts of the upper are tested in accordance with the method prescribed in SATRA PM 30 , the value shall not be less than 3 kg |
| | 4 | SAMPLING AND CRITERIA FOR CONFORMITY<br>For the purpose of ascertaining the conformity of the material in a consignment of this specification, the scale of sampling and criteria for conformity shall be as prescribed in IS 205: 1962 |
| | 5 | MARKING<br>The size and fitting of the shoe shall be lefible stamped on the waist of the full sock, the manufacturers name of recognized trademark, if any, together with the year of supply may also be leggbly stamped on the waist of sock |
| | 6 | PACKING<br>Each pair of shoes shall be wrapped in tissue paper and put in a cardboard carton. Each carton shall be marked with the size and Fitting of the shoes |

स्वाक्षरी / —
अध्यक्ष
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

स्वाक्षरी / —
शिक्षण प्रमुख
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका
स्पेसिफीकेशन सन २०१०—११
निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक ०९/०७/२०१०
दुपारी १ वाजेपर्यंत
विद्यार्थ्यांकरिता बुट मोजे
बयाणा रक्कम २,००,०००/—
विद्यार्थी संख्या ८४१९१

शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांतील इ. १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळामार्फत रजिस्टर ट्रेडमार्क असलेल्या कंपनीचे बुट मोजे पुरविणाऱ्या पुरवठादार/कंपन्यांनी दोन पाकीट पध्दतीने निविदा भरावयाची आहे. नामांकित बुट मोजे उत्पादक कंपन्यांचे बुट मोजे पुरविण्याबाबतचे अधिकार व नामांकनाबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

खालील प्रमाणे इयत्ता नुसार बुट मोजेंचे दर देण्यात यावेत बुट मोजेंचे प्रत्येकी तीन मुलांचे व तीन मुलींचे नमुने देणे आवश्यक आहेत. प्रत्येक बुट मोजेंचे एका पेक्षा अधिक दर देवू नये तसेच नमुन्याशिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. शासन मान्य प्रयोगशाळेचे तपासणी अहवाल ग्राहय धरले जातील व त्या संबंधीचा कोणताही पत्र व्यवहार गृहीत धरला जाणार नाही निविदादारांने प्रत्येक ब्रॅडच्या बुट मोजेंचे नमुना तपासणी खर्चापोटी खालीलप्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे

१ बुटमोजे — विद्यार्थी — नमुना तपासणी फी रू ४,०००/— प्रत्येकी
२. बुटमोजे — विद्याथीर्नी — नमुना तपासणी फी रू ४,०००/— प्रत्येकी

निविदादारांनी नमुना तपासणी खर्च निविदा सादर करताना कर्यालयात चलनाने रोख भरणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे नमुना तपासणी करिता पाठविले जाणार नाही व त्याची निविदा विचारात घेतली जाणार नाही

तपशिल

**<u>खालीलप्रमाणे बुट मोजे</u>**

प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी (मुले व मुली)

१. फोम लेदर अप्पर ॲण्ड मोल्डेड पीव्हीसी सोल बुट १ जोड
२. नायलॉन पायमोजे ( आय एस ५०८४:१९९० तत्सम) २ जोड

(भारतीय मानक ब्युरो स्पेसिफिकेशन दर्जानुसार ) सविस्तर स्पेसिफिकेशन सोबत जोडले आहे.

बुट मोजेचे दर सर्व करासह देण्यात यावेत. एका निविदा फॉर्ममध्ये एका ब्रॅण्डचाच दर देण्यात यावा. छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही. बुट मोजेंचे शाळावार वाटप करावे लागेल. योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर या फॉर्ममध्ये स्पेसिफिकेशन बाबत काही शंका असल्यास, सांख्यिकी किंवा नकळत टायपिंग चूक झाली असल्यास संबंधित भांडारपालांशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/— | स्वाक्षरी/— |
| अध्यक्ष | शिक्षण प्रमुख, |
| शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. | शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. |

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**शिवाजी नगर, पुणे ४११००५**
**बुट मोजे पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती सन २०१०—११.**

**१.संदर्भः—**

पुणे दैनिक सकाळ व दैनिक लोकमत दि.२४/०६/२०१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं.२फेरनिविदा /भांडार/विद्यार्थी **बुट मोजे** पुणे शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांमधील सर्व माध्यमाच्या इयत्ता १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यासाठी बुट मोजे पुरविण्याचे कामी **विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा खालीलप्रमाणेः—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या **खरेदी समितीने** शैक्षणिक आर्थिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ट ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यालय स्पेसिफिकेशननुसार नमूद केलेल्या बुट मोजेंचे दर देण्यात यावा.

निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**१.अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

१) निविदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा बयाणा रकमा रोख भराव्या लागतील.

२) निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

३) आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २०१० अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.संबंधित फर्मची मागील तीन वर्षाची उलाढाल निविदा रकमेच्या तीनपट असल्यास प्राधान्याने विचार केला जाईल.

४)शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना बुट मोजे पुरवल्या बाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

५)निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

६) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

७) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

८) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करण्यासंबधीची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे निविदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे. अद्ययावत प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हान्सी) आवश्यक आहे.

९) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष सादर कराव्या लागतील.

२.पाकीट **"ब"** मध्ये निविदा धारकाने इयत्ता निहाय सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून त्यावर निविदा क्रमांक व निविदेचे नाव नमुद करून सादर करावा.

३ .**अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा.शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

**.ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

विहीत नमुन्यातील मुलां/मुलींचे इयत्ता निहाय बुट मोजेंचे दर सर्व करासह द्यावेत.

**४.निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१.निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. बुट मोजेचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२.निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा शिक्षण मंडळास राहील.

३.निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

४.मान्य निविदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निविदादारास करार करतेवेळी बुट मोजे पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.

६. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७.निविदा फॉर्मनुसार पाकिट नंबर **ब** मधील ज्या बुट मोजेंचे दर भरण्यात आलेले आहेत. त्यापैकी प्रत्येकी तीन नमुने निविदादाराने स्वखर्चाने निविदा सोबत दयावयाचा आहे. सदर नमुना खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर नाही. नमुने दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.

८.बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

९.बुट मोजे पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष

परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास राहिल.

१०.दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे बुट मोजे न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

११.करारनाम्यानुसार सर्व बुट मोजेंचा पुरवठा दिलेल्या मुदतीत जकातीच्या रकमेसह शिक्षण मंडळाच्या कार्यालयीन कोठीत करावा लागेल. त्यानंतर मा शिक्षण मंडळाची पाहणी झाल्यानंतर त्यातील काही नमुने शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी करून घेतली जाईल.व तपासणीचा अहवाल सकारात्मक आल्यानंतरच ठेकेदाराने सदर बुट मोजेंचा पुरवठा शिक्षण मंडळाने दिलेल्या यादीनुसार प्राथमिक शाळांमध्ये पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर राहील.

१२प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालानुसार निविदादारानी पुरविलेल्या बुट मोजे स्पेसिफिकेशननुसार नसतील तर सदरच्या बुट मोजे निविदादाराने १० दिवसांच्या आत स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू. ५०००/— (अक्षरी रूपये पाच हजार फक्त ) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही

१३.पुरवठा केलेले सर्व बुट मोजे मोजून, तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व बुट मोजे असल्याची खात्री मा शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१४.निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा शिक्षण मंडळ भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१५.एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१६. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल.त्यापुर्वी कोणलाही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा परतावा मागताना रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७. निविदादाराने बुट मोजे पुरविण्यास तयार झालेल्या आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१८.बुट मोजे पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१९.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

२०मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या बुट मोज्यांचे एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार बुट मोजेचा पुरवठा करताना प्राप्त केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा.मुख्याध्यापकाच्या नाव,स्वाक्षरी, तारिख व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील व पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२१. निविदा दिनांक ९/७/२०१० रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.त्यावेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.
दिनांक:—

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/— | स्वाक्षरी/— |
| अध्यक्ष | शिक्षण प्रमुख, |
| शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. | शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. |

---

**प्रतिज्ञालेख**

मी,श्री.——————————————————————वय———वर्ष
व्यवसाय—धंदा,राहणार——————————————————————
निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

पुणे:—
दिनांक:—

पुरवठा धारकाचे नाव,सही व शिक्का

**शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपलिका**
**कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना**
**फेरनिविदा**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**१.कोरे निविदा प्रपत्र विक्री –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून गुरुवार दिनांक २४/६/१०पासून गुरुवार दिनांक ०८/०७/१० पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल.

**२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक ०९/०७/१० रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत

**३. निविदा उघडण्याची वेळ** शुक्रवार दिनांक ०९/०७/१०रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**४. निविदा दर** सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे.

५ शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष २०१०–११ अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशिल

| अ.क्र. | तपशील | अंदाजे नग संख्या | तरतुद रूपये | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | **विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी बुट व पायमोजे** | ८४,१९१ | २,००,००,०००/– | २,०००/– |

सूचना

१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.निविदा फॉर्म सोबत

अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. निविदेमध्ये नमूद केलेल्या बुट मोजे रजिस्टर ट्रेडमार्क असलेल्या कंपनीचेच खरेदी करावयाचे आहेत. त्याकरिताच निविदादाराने निविदा घ्याव्यात व भरून द्याव्यात

३. निविदा प्रसिध्दी प्रक्रिया माल स्विकारताना घ्यावयाची दक्षता, अनुषंगिक करार इ. सर्व बाबींकरिता महाराष्ट्र शासनाने २ जानेवारी १९९२ रोजी प्रसिध्द केलेला शासन निर्णय व शिक्षण मंडळ कायदा १९४७ व नियम १९४९ चे तरतूदीस अधारितच असेल.

४. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील

५. शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या शाळांतील इयत्ता १ली ते ७वी ची विद्यार्थी संख्या कमी अधिक झाल्यास वरील बुटमोज्यांची संख्या कमी अधिक होण्याची शक्यता आहे. साहित्य पुरविण्याचे आदेश मिळाल्यापासून एकूण ३० दिवसाचे आत बुटमोज्यांचा पुरवठा शिक्षण मंडळाचे कार्यालयीन कोठीत करावालागेल. व त्याचे शासन मान्य प्रयोगशाळेकडून बुटमोज्यांची तपासणी करून घेतल्यानंतर त्याचे १५ दिवसांचे आत शाळावार वाटप निविदादाराला करावे लागेल.लागेल.

६. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/— | स्वाक्षरी/— |
| अध्यक्ष | शिक्षण प्रमुख, |
| शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. | शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा. |